बीड । शनिवार
१९.०७.२०२५
वर्षे : ५ अंक : १०९
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955



# भ्रष्टाचारी किरण देशमुख याला 'धसकट' साथ

**नगरपालिका प्रशासनाचा कारभार म्हणजे बोंबला रे बोंबला ! नगरपालिका फंडात कोट्यावधीचा घोटाळा ; तरीही नगरपालिका प्रशासनाला जाग येईना !**

### किरण देशमुख याला आकाची साथ म्हणूनच बीड झाला भकास !



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेत यापूर्वी कधीही न झालेली कामे या मागील पाच वर्षात मोठ्या प्रमाणात झालेली आहेत. यामध्ये अनेक कामात बोगसपणा झालेला असून नगरपालिका फंडातील अनेक कामे न करता बिले उचलली गेली असल्याची चर्चा होत असून. शहरातील माजी नगरसेवक सह अनेक सामाजिक कार्यकर्ते व राजकीय पदाधिकाऱ्यांनी या संदर्भात थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केलेली असतानाही नगरपालिका प्रशासन या भ्रष्ट अधिकाऱ्यांची साधी चौकशीही करत नसल्याने प्रशासनापढे बोंबला रे बोंबला म्हणण्याची वेळ आली आहे. विशेष म्हणजे नगरपालिकेतील भ्रष्ट अभियंता किरण देशमुख यांना धसकट साथ असल्याने सत्तेची मस्ती त्यांच्या डोक्यावर चढली आहे का असा प्रश्न उपस्थित होत असून नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनाही किरण देशमुख जुमानत नसल्याचे दिसून येत आहे. नगरपालिकेत कधीही न येता कोठ्यावधी रुपयांची बिले आपल्या खाजगी कार्यालयात बसून शैक्षणिक करणारे राज्यातील बहुतेक नगरपालिका प्रशासनातील अभियंता किरण देशमुख पहिलेच असावे.

उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगर विकास खाते आहे. राज्यातील नगरपंचायत व नगरपालिकेचा कारभार यांच्यावर देखरेख करण्याचे काम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या खात्याचे आहे. बीड जिल्ह्या त एकनाथ शिंदे गटाचे मातब्बर नेते आहेत मात्र नगरपालिका प्रशासनाच्या भ्रष्ट कारभाराचे साधे पत्रकही या नेत्यांकडून ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कडे पत्रकार संघ तक्रार करणार

**उपमुख्यमंत्री व नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत नगरपालिका विभागातील भ्रष्ट अधिकारी किरण देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांची लेखी तक्रार निर्भीड पत्रकार संघ करणार असून पत्रकार संघातील एक शिष्टमंडळ लवकरच मुंबई येथे जाणार आहे. मागील अनेक महिन्यांपासून नगरपालिका फंडातील विकास निधीवर डल्ला मारणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यासाठी निर्भीड पत्रकार संघ पुढे आले असून. मंत्रालयातील निर्भीड पत्रकार संघातील पदाधिकारी ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची लवकरच भेट घेणार आहे. बीड नगरपालिकेचा भ्रष्टाचाराचा कळस झाला असून शहरातील नागरिकांना सुविधा पासून दूर ठेवत आपले चांगभले करणारे अधिकारी लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या रडावर येणार आहेत.**

# दिव्यांग, जेष्ठांना कृत्रिम साहित्य देण्यासाठी 1067 जणांची तपासणी

**खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते शिबीराचे उद्घाटन**



**केज । प्रतिनिधी**

जिल्हा समाज कल्याण विभाग बीड व एलिम्को मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्यामध्ये दिव्यांगांना व जेष्ठ नागरीकांना मोफत कृत्रिम साहित्य साधने वाटप करण्याच्या अनुषंगाने दि.१८ जुलै रोजी पंचायत समिती येथे पूर्व तपासणी शिबीर संपन्न झाले. शिबीराचे उद्घाटन खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते झाले असून शिबीरात १०६७ जणांची तपासणी करण्यात आली.

यावेळी तहसीलदार गिड्डे, समाज कल्याण अधिकारी मेश्राम, गटविकास अधिकारी दिवाने, डॉ. थोरात, तालुका आरोग्य अधिकारी डॉग़वळी, गटशिक्षणाधिकारी बेडसकर, अलिम्को संस्थेची सर्व टिम, ज्ञानेश्वर चौरे, शंकर जाधव, ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● आवश्यक कागदपत्रे

**दिव्याग: दिव्यांग प्रमाणपत्र आणि युडीआयडी कार्ड, आधार कार्ड, वार्षीक उत्पन्नाचा दाखला/ रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे मासिक २२५०० किंवा वार्षीक २७०००० च्या आत, व जेष्ठ नागरिकांसाठी आधार कार्ड, वार्षीक उत्पन्नाचा दाखला/रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे (मासिक १५००० किवा वार्षीक १८०००० च्या आत असावे. अशी माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी, एस.एन.मेश्राम यांनी दिली आहे.**

# नगरगर पालिकेनी किमान नागरिकांच्या मूलभूत गरजा द्या : जगदीश गुरुखुदे



**बीड । प्रतिनिधी**

नगरपालिकेने मूलभूत गरजा पूर्ण करणे म्हणजे नागरिकांच्या आवश्यक गरजा कीमन पिण्याचे पाणी, स्वच्छता, आरोग्य सेवा, शिक्षण, रस्ते आणि वीज यांसारख्या सुविधा बीड आशियाना द्या अशी मागणी भाजपाचे शहराध्यक्ष जगदीश गुरखुदे यांनी बीड नगर पालिकेकडे निवेदन देऊन केली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की बीड शहरातील नागरिकांच्या विविध मुलभूत अडचणी सोडविणे शहरात नागरीकांसाठी नगर परिषद कार्यालयामार्फत पुरविल्या जाणाऱ्या मुलभूत सुविधांमध्ये सद्यस्थितीत पावसाच्या वातावरणामुळे स्ट्रीट लाईट नादुरुस्त होऊन शहरात बऱ्याच ठिकाणी अंधार आहे, त्या स्ट्रीट लाईट दुरुस्त करुन काही ठिकाणी नवीन स्ट्रीट लाईट बसविणे आवश्यक आहे, शहरात स्वच्छतेचा, पाणी टंचाईचा प्रश्नही गंभीर होत चालला असून घंडागाडी व इतर सुविधा अपुर्ण पडत आहेत. या सर्व कारणांमुळे रोगराई व अपघाताचे प्रमाण वाढले आहे. कामात होणाऱ्या विलंबाबाबत चौकशी केली असता, विविध कामाच्या टेंडर करिता आपणाकडून ठराव देण्यात आले नाही. तरी आपण आपल्या अधिकारातून तात्काळ निर्णय घेण्यात यावा. जेणेकरुन नागरीकांना मुलभूत सुविधा पुरविणे सोईचे ठरेल. आपण आवश्यक त्या कामांना मंजुरी द्यावी.

- पाणीपुरवठा: नागरिकांना स्वच्छ आणि पुरेसा पिण्याचा पाणीपुरवठा करणे.
- स्वच्छता: शहरातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि परिसरांची नियमित स्वच्छता करणे.
- आरोग्य सेवा: आरोग्य केंद्र, दवाखाने आणि आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करणे.
- रस्ते आणि दळणवळण: चांगले रस्ते, सार्वजनिक वाहतूक आणि दळणवळणाची साधने उपलब्ध करणे.
- वीज: २४ तास वीजपुरवठा सुनिश्चित करणे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## तलवारीने केक कापल्याचा थाट; सोशल मिडीयावर फोटो व्हायरल होताच दिंद्रुड पोलिसांची कारवाई



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील उमरी गावात एका तरुणाचा वाढदिवस तलवारीने केक कापून आणि डीजेवर नाचत धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. मात्र, या हटके स्टाईलमुळे आता संबंधित तरुणांसह एकूण पाच जणांना पोलीस कारवाईला सामोरे जावे लागले आहे. १५ जुलै २०२५ रोजी अनिल जनार्धन शिंदे याने आपल्या गावात मित्रमंडळींसह डीजेच्या गजरात वाढदिवस साजरा केला. यावेळी वजन दाखवण्यासाठी केक थेट तलवारीने कापण्यात आला. हा प्रकार▶▶ उर्वरित पान २ वर

## पिकाला भाव नाही, निसर्ग बेभरवशी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या, कर्जमाफी करून ७/१२ कोरा



**बीड । प्रतिनिधी**

कर्जमाफी वरून शेतकऱ्यांमध्ये सरकारविरुद्ध प्रचंड संताप आहे.. आश्वासन देऊनही सरकार कर्जमाफी देत नसल्याने आता बीड जिल्ह्यातही शेतकऱ्यांचे आंदोलन उभे राहत आहे.. पालवण (तालुका बीड) येथे आज शेतकऱ्यांशी संवाद साधत ७/१२ कोरा अभियान धनंजय गुंदेकर यांनी सुरू केले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी बँकेकडून आलेल्या नोटीस दाखवल्या. सक्तीने कर्ज वसूल करणाऱ्या बँकांचा यावेळी निषेध नोंदवण्यात आला. पिकाला योग्य भाव नाही, उत्पन्न निघत नाही अशात निसर्ग प्रचंड बेभरवशी राहत असून यंदा दुबार पेरणीचे संकट असल्याने कर्जमाफी मिळायलाच हवी अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली.

संवाद दौरा बैठकीवेळी श्रावण मस्के, शिवाजी मस्के, पिनू जटाळ, दिनकर जटाळ, गंगाधर मस्के, आत्माराम पवार, अश्रुबा नजान, विनायक जटाळ, बाबासाहेब मस्के, अशोक पवार, विलास मस्के, गोविंद मस्के, अशोक शेळके, शुभम मस्के, बालू मस्के, लक्ष्मण मस्के, माऊली साबळे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.. बैठक समन्वय अशोक पवार यांनी केले.

## 600 कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण करत अंबाजोगाई पिपल्स बँकेची गरुडझेप

**ग्राहकांच्या विश्वासार्हतेच्या बळावरच बँकेची यशस्वी कामगिरी : चेअरमन राजकिशोर मोदी**



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई पिपल्स को-ऑप सहकारी बँकेने ग्राहकांना दर्जेदार बँकींग सेवा देत ६०० कोटी रुपये ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. नुकतेच बँकेच्या सर्वोत्तम एनपीए व्यवस्थापनामुळे शहरी सहकारी बँक गटात 'भारतरत्न सहकारिता पुरस्कार २०२५' ने ही गौरवविण्यात आले आहे. अंबाजोगाई पिपल्स बँकेने पारदर्शक, गतिमान कारभार व तत्पर सेवेला नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यामुळे नेहमीच उत्तम टीमवर्क करून बँकेने सभासद, ठेविदार, ग्राहक आणि हितचिंतक यांची विश्वासार्हता कमावली असल्याचे बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले.






# २१ वर्षापासुन फरार आरोपीच्या पोलीसांनी ठोकल्या बेड्या : पो.नि.सुर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही



**माजलगाव । प्रतिनिधी**

सटवा बापुराव नेमाने हा गुंज,ता. पाथरी, जिल्हा परभणी येथील रहिवासी आहे. त्याच्याकडे ६१ जहाजे आणि १२ शेळ्या होत्या. त्याने गुंजथडी गावातील दत्तात्रय तांगडे यांच्या शेतात जहाजे आणि शेळ्या बांधल्या. त्यावेळी लक्ष्मण रामभाऊ राहुभूत, त्याचे दोन मुलगे नामदेव आणि विष्णु, शेताचं मालक दत्तात्रय मुंजाभाऊ तांगडे आणि नारायण गणपत तांगडे त्याच्यासोबत होते. माहिती देणारा आणि लक्ष्यण वगळता ते सर्व झोपले होते. ८.४.२००४ रोजी मध्यरात्री १२.०० ते १.०० वाजेच्या सुमारास, खबर देणाऱ्याने लक्ष्मणला झोपायला सांगितले आणि तोही झोपला. अचानक एक व्यक्ती त्याच्या जवळ आली आणि आवाज करू नको असे म्हणत त्याने काठीने त्याच्यावर हल्ला केला. दरम्यान, लक्ष्मण उठवण्याचा प्रयत्न करत असताना, त्याच वेळी कोणीतरी काठीने त्याच्या डोक्यावर हल्ला केला, ज्यामुळे त्याचे डोके फुटले. त्यावेळी इतर सर्वजण झोपले होते. जेव्हा त्या व्यक्तीने खबऱ्याची जहाजे पळवून नेली, तेव्हा काही वेळाने खबऱ्या आणि इतरांना स्वतःला सोडता आले. त्यांनी एकमेकांचे हातपाय उघडले. ते सर्व घाबरले. त्यामुळे त्यांनी कोणताही आवाज केला नाही. त्यानंतर खबऱ्या गुंजथडी गावात गेला आणि तेथून त्याने माजलगाव येथील त्याच्या नातेवाईकांना फोन करून घटनेची माहिती दिली. त्यानंतर तो गुंज येथे गेला आणि पाथरी पोलिस ठाण्यात माहिती देण्याचा प्रयत्न केला, परंतु फोन कनेक्ट झाला नाही. त्यानंतर तो गुंजहून पुन्हा गुंजथडी गावात गेला आणि ग्रामस्थांच्या मदतीने जहाजांची झडती घेतली, परंतु जहाजे सापडली नाहीत. त्यानंतर तो पुन्हा पोलिस ठाण्यात आला आणि ८.४.२००४ रोजी दुपारी २.०० वाजता त्याने ४ अज्ञात चोरांविरुद्ध त्याच्या ५५ जहाजे आणि ▶▶ उर्वरित पान २ वर




# उद्योजकांना उद्योजकांकरीता वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळाच्या विविध कर्ज योजना

कुठल्याही योजनेचे यश हे लोकाभिमुखता, पारदर्शकता व सुलभ कार्यप्रणालीवर अवलंबून असते. सर्वसामान्यांची कामे सुलभरित्या व स्थानिक पातळीवर होणे आवश्यक असते. शासन प्रत्येक क्षेत्रात विकासाच्या अनेक योजना राबवित असते. गरजूंसाठी तो आधार तर असतोच त्याचप्रमाणे, सामूहिक विकास प्रक्रियेलाही त्यातून गती मिळत असते. काय आहे ही योजना.. जाणून घेवू या लेखातून...

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या) व दोन उपकंपने राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, पैलवान कै.मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ या महामंडळाची स्थापना केली आहे.

समाजातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या आर्थिक उन्नतीसाठी महामंडळामार्फत स्वयंरोजगाराच्या विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. छोटे व्यावसायिक व स्वयंरोजगाराकरीता रु. 1.00 लक्ष ची थेट कर्ज योजना (नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज नाही) व 25 टक्के बीज भांडवल योजना या योजना ऑफलाईन अर्ज आहे. तसेच वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना योजना (रु. 15 लाख) व गट कर्ज व्याज परतावा (रु. 10 लाख)आहे.

रु. 1.00 लक्ष थेट कर्ज योजना : लाभार्थींना हे कर्ज महामंडळातर्फे दिले जाते. कर्ज परत फेडीचा कालावधी 4 वर्ष आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा 18 ते 55 वर्षे आहे. कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज आकारण्यात येणार नाही. मासिक हप्ता रु. 2085.

25 टक्के बीज भांडवल योजना :- कर्जाची उच्चतम मर्यादा रु. 5 लक्ष पर्यंत. कर्ज परत फेडीचा कालावधी 5 वर्षे आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा 18 ते 50 वर्ष आहे. बँकेमार्फत




लाभार्थींना 75 टक्के कर्ज उपलब्ध केले जाते. यामध्ये महामंडळाचा सहभाग 25 टक्के, बँकेचा सहभाग 75 टक्के महामंडळाच्या रक्कमेवर व्याजाचा दर 4 टक्के असतो.

या योजनांसाठी लागणारी सर्वसाधारण कागदपत्रे :- पासपोर्ट साईज 2 फोटो, तहसिलदार/नायब तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा मूळ (ग्रामीण व शहरी भागासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 1 लक्ष), सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र (विजाभज व वि.म.प्र), दरपत्रक (कोटेशन), प्रकल्प अहवाल, आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा निवडणूक ओळखपत्र व शिधापत्रिकेची झेरॉक्स, स्थानिक स्वराज्य संस्थेचे (ग्रामपंचायत/नगरपालिका) व्यवसाय करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र, डोमिसाईल, रहिवासी दाखला, आधारकार्ड लिंक केलेल्या पासबुकची झेरॉक्स, वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र/जन्मतारखेचा दाखला, भाडेकरार किंवा संबंधित जागामालकाचे संमतीपत्र व व्यवसायाच्या जागेचा असेसमेंट उतारा इ. कागदपत्रे लागतात.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना या योजनांकरीता महामंडळाच्या www.vjnt.in या संकेतस्थळाला भेट देवून ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु. 15 लक्ष पर्यंत) :- ही योजना संपूर्णपणे संगणीकृत आहे. या योजनेमध्ये बँकेने रु. 15लाखापर्यंतच्या मर्यादित कर्ज मंजूर केलेल्या अर्जदाराने कर्जाचे हप्ते नियमित भरल्यानंतर व्याजाची रक्कम (12 टक्के मर्यादित) अर्जदाराच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते. कर्ज परतफेडीचा कालावधी 5 वर्ष आहे. या योजनेसाठी अर्जदाराचे वय 18 ते 50 असावे, महामंडळाच्या www.vjnt.org, या वेबपोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणीकृत सशर्त हेतुपत्र (Letter of Intent) दिले जातात.

गट कर्ज व्याज परतावा योजना (रु.10 लक्ष ते 50 लक्ष पर्यंत) :- विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गतील महामंडळाच्या निकषांनुसार विहीत केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादितील उमेदवारांच्या बचत गट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी (कंपनी अधिनियम 2013 अंतर्गत), LLP, FPO अशा शासन प्रमाणिकरण प्राप्त संस्थाना बँकेमार्फत स्वयंरोजगार उद्योग उभारणीकरीता जे कर्ज दिले जाते.

या योजनेमध्ये बँकेने रु. 10 लक्ष ते रु. 50 लक्ष पर्यंतच्या मर्यादित कर्ज मंजूरी केलेल्या अर्जदाराने कर्जाचे मासिक हप्ते नियमित भरल्यानंतर व्याजाची रक्कम ( 12 टक्के मर्यादित) अर्जदाराच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते. (जास्तीत जास्त 12 टक्के व्याजदराच्या किंवा रु.15.00 लाखाच्या मर्यादित) कर्ज परत फेडीचा कालावधी 5 वर्षे आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा 18 ते 45 वर्षे आहे. अर्जदारांने अर्ज करण्यासाठी सर्व सभासद हे विजाभज व वि.म.प्रवर्गातील असावी. महामंडळाच्या www.vjnt.org या वेबपोर्टलद्रवारे ऑनलाईन पध्दतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणीकृत सशर्त हेतुपत्र (Letter of Intent) दिले जातात.

या योजनांसाठी लगणारी सर्व साधारण कागदपत्रे पासपोर्ट साईज फोटो, तहसिलदार/नायब तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा मुळ दाखला, (कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. 8.00 लाख), सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचा दाखला ( विजाभज व वि.म.प्र), दरपत्रक ( कोटेशन), आधारकार्ड, पॅनकार्ड, शिधापत्रिका, डोमिसाईल, रहिवासी दाखला, आधारकार्ड लिंक केलेल्या बँक पासबुक, वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे दाखला/जन्म तारखेचा दाखला, व्यवसायचे कोटेशन लागते.

इच्छुक, गरजु विजाभज व वि. म.प्रवर्गातील व्यक्तींनी योजनेच्या अधिक माहितीकरीता वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या), राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय: श्री राम समर्थ गृहनिर्माण संस्था मर्या., सदनिका क्र. 01, तळमजला, मारुती मंदिरामागे, चेंढरे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड, दूरध्वनी क्र. 02141-221307, Email – vnvintdcraigad3@gmail.com येथे संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी www.vjnt.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे जिल्हा व्यवस्थापक पोपट गिते यांनी कळविले आहे.

- जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग

पान १ वरून पुढे...

## भ्रष्टाचारी किरण...

काढले जात नाही. अनेक नेत्यांची गुत्तेदारी या नगरपालिकेतून चालत असल्याने कदाचित शहरातील नागरिकांच्या सुविधांचे यांना देणे लागत नाही. नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात यापूर्वी अनेक नेत्यांनी तक्रारी केल्या मात्र पुढे काय झाले हे गुलदस्त्यात आहे. नगरपालिका विभागातील सर्वात महत्त्वाचे विभाग म्हणजे बांधकाम विभाग या विभागावरच शहरातील विकास अवलंबून आहे मात्र या विभागाचे तीन तेरा करणारे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी मात्र बीड शहर विकण्याचा घाट घातला आहे. शहरातील विविध विकास कामे करत असताना नगरपालिका फंडाची कशी वाट लावली जाते हे फक्त किरण देशमुख यांच्याकडे पाहूनच समजत आहे. नगरपालिकेत कधीही न येता बाहेरील खाजगी कार्यालयातून कामे करत विकास च्या नावाखाली स्वतःचा विकास करणारे असे भ्रष्ट अधिकाऱ्यावर जिल्हा प्रशासन मेहरबान का ? बीड नगरपालिकेत लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यावर कोणाचेही बंधन नसल्याने यांची मुजोरी वाढलेली आहे. येणाऱ्या फंडांचे कसे नियोजन करायचे याची चर्चा दोन-चार अधिकाऱ्यांच्या व्यतिरिक्त कोणातच होत नसल्याने फंड कसे वापरायचे व कसे खायचे याबाबत नगरपालिकेत दररोज मिटिंग होत असतील. विशेष म्हणजे स्वच्छता विभाग, विद्युत विभाग, व पाणीपुरवठा विभागावर नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष असून या तिन्ही विभागात कंत्राटदारांचे लाखो रुपये अडकून पडलेले आहेत मात्र फक्त बांधकाम विभागातीलच गुत्तेदारांचे बिले काढण्यात येत आहेत. मागील तीन महिन्यात बांधकाम विभागातून किती नगरपालिका फंडातील बिले काढण्यात आली याचीही चौकशी झाल्यास बीड शहरातील अनेक भागात झालेली कामे व न झालेली कामांचे बिले कशी अक्कल लावून अधिकारी काढत आहे याची पोलखोल नक्कीच होईल. अभियंता किरण देशमुख यांच्या डोक्यावर सत्ता पक्षातील कोण्या एका आमदाराचा हात आहे म्हणे. या आमदाराच्या छाया छत्राखाली किरण देशमुख वावरत असून आपले कोणीही काही बिघडू शकत नाही या अविर्भावात आजपर्यंत ही किरण देशमुख नगरपालिकेत स्वतःच्या कार्यालयात उपलब्ध झालेले नाहीत.

पान १ वरून पुढे...

अशा भ्रष्ट व शासकीय वेतन घेऊन खाजगी कार्यालयातून कामे करणाऱ्या अभियंत्यावर मुख्याधिकारी व जिल्हाधिकारी यांच्यासह सत्ता पक्षातील पदाधिकारी ही मेहरबान झाल्याचे दिसून येत आहे.

## दिव्यांग, जेष्ठांना...

पिंटू ठोंबरे, बंडू चौधरी यांची उपस्थिती होती. शिबीरामध्ये दिव्यांगांना जयपुरी फुट, कृत्रिम हात, कॅलीपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, वॉकींग स्टीक, ब्रेल किट, स्मार्ट फोन, श्रवणयंत्र या सह जेष्ठ नागरीका करीता बेल्ट, वॉकर, काठया, चष्मे, कृत्रिम दात, खुबड, कृत्रिम अवयव, कानाची मशिन, व्हिलचेअर कमोडसहीत, सिलीकॉन खोम तकीया, नीब्रेस, स्पायनल सपोर्ट, सरवायकल कॉलर या सह इतर साहित्य वाटप करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने पुर्व तपासणी शिबीर त्या-त्या तालुक्यातील पंचायतसमितीमध्ये आयोजित करण्यात येत आहे. दि.१८ जुलै रोजी केज येथे सदर शिबीराचे उद्घाटन खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते झाले.

### ● अशी झाली तपासणी

मुकबधीर १६५
मतिमंद ८४
अंध १२०
अस्थिव्यंग ४१६
जेष्ठ नागरिक ९२
मतिमंद-उमरी ७५
मुकबधीर- उमरी ७५
अस्थिव्यंग-केज ३५ एकूण १०६७

### ● शिबीराबाबत अधिक माहिती

तालुका दिनांक ठिकाण
अंबाजोगाई १९ जुलै पंचायत समिती
बीड २१ जुलै पंचायत समिती
माजलगाव २२ जुलै पंचायत समिती
पाटोदा २३ जुलै पंचायत समिती

पान १ वरून पुढे...

वडवणी २४ जुलै पंचायत समिती
आष्टी २५ जुलै पंचायत समिती
धारूर २६ जुलै पंचायत समिती
परळी २८ जुलै पंचायत समिती
शिरूर २९ जुलै पंचायत समिती
गेवराई ३०जुलै पंचायत समिती

## नगरगर पालिकेनी...

● कचरा व्यवस्थापन: कचरा गोळा करणे, प्रक्रिया करणे आणि विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करणे.

● आपत्कालीन सेवा: अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका सेवा तत्परतेने उपलब्ध करणे. याव्यतिरिक्त, नगरपालिका सार्वजनिक उद्याने, म नोरंजनाचे ठिकाणे, क्रीडांगणे आणि इतर आवश्यक सुविधा देखील पुरवू शकते. अशीमागणी जगदीश गुरखुदे भा.ज.पा. शहराध्यक्ष तथा नगर सेवक, बीड यांनी केली आहे.

## तलवारीने केक...

त्याचा भाऊ सुनिल शिंदे याने फेसबुकवर शेअर केला. सदर फोटो सोशल मिडीयावर व्हायरल झाल्यानंतर पोलीस ठाणे दिंद्रुडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे यांच्या लक्षात आला आणि तातडीने कारवाई करण्यात आली.

या प्रकारात तलवारी वापरणाऱ्या चार जणांची ओळख पटली आहे – १) अनिल जनार्धन शिंदे(३४),२) महादेव प्रताप शिंदे (२२) – दोघेही रा. उमरी,३) विशाल गवळी – रा. पिंपळगाव (नाखला),४) दादा म्हस्के – रा. पात्रुड,तर सोशल मिडीयावर फोटो अपलोड करणारा५)सुनिल जनार्धन शिंदे – रा. उमरीया सर्वांवर शस्त्र अधिनियम १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कार्यक्रमात वापरलेल्या तीन तलवारी पोलिसांनी जप्त केल्या आहेत. ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक नवनित काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव

पान १ वरून पुढे...

ढाकणे, पोउपनि संजयकुमार राठोड, सफौ नंदकुमार वाघमारे, पोह. युवराज श्रीडोळे आणि पोशि. कैलास पोटे यांनी केली. या घटनेमुळे सामाजिक माध्यमांवर 'वजनदार' फोटो टाकणे किती महागात पडू शकते, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे.

## २१ वर्षापासुन...

१,००० रुपये अशी एकूण ३३,००० रुपये चोरीला जात असल्याची तक्रार दाखल केली. सदर तक्रारीच्या आधारे आरोपी आणि इतरांविरुद्ध भारतीय दंड कलम ३९५, ३४२ आर.डब्ल्यू. १४९ अंतर्गत गुन्हा क्रमांक ८४/२००४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तपास सुरू करण्यात आला. साक्षीदारांचे जबाब नोंदवले आणि घटनास्थळी पंचनामा तयार केला. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुद्ध जे.एम.एफ.सी, माजलगाव यांच्यासमोर आरोपपत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर यातील आरोपी नामे आप्पा महीपती पवार वय-४० वर्ष व्यवसाय रिक्षा चालक रा. कोटाळा ता. सोनपेठ जि. परभणी स्वताची ओळख लपवुन मागील २१ वर्षा पासुन फरार होता. गोपनिय बातमीदार मार्फत माहीती मीळाली की, गुन्हा क्र.८४/२००४ कलम ३९५, ३४२ भा.द. वी. आर.डब्ल्यू. १४९ मधील पाहीजे फरारी आरोपी नामे आप्पा महीपती पवार वय-४० वर्ष व्यवसाय रिक्षा चालक रा. कोटाळा ता. सोनपेठ जि. परभणी हा सोनपेठ येथील रिक्षा पॉईंट येथे आहे त्यावरुन त्यास सोनपेठ येथुन तांत्रीक विष्लेशनाद्वारे शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले व पोस्टे माजलगाव शहर येथे आणले. त्याचे अटकेची प्रक्रीया करुन गुन्ह्या संदर्भाने तपास केला असता त्याने काहिएक सहकार्य केले नाही व त्यास मा. न्यायालयात हजर केले व मा. न्यायालयाने चउठ मंजुर केल्याने त्यास जिल्हा कारागृह बीड येथे दाखल केले. सदरची कारवाई नवनित काँवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, निरज राजगुरु उपविभागीय पोलीस अधिकारी माजलगाव यांचे मार्गदर्शनाखाली राहुल सूर्यतळ पोलीस निरीक्षक माजलगाव शहर,पोउपनि / के.बी. म ाकणे, पोह/१४६० शेख, पोशि/ १९२६ चव्हाण, पोशि/२२९९ थापडे, पोशि/२०८ पोकळे यांनी केली आहे.

पान ४ वरून पुढे...

## हिंदू मुस्लिम...

यावेळी बाहेरूनही भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. सकाळी गावातून मिरवणूक काढली जाते.त्यानंतर डोंगरावर असलेल्या दर्ग्यावर चादर अर्पण केली जाते.त्यानंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात येते.त्यानंतर संध्याकाळी छबीना मिरवणूक काढली जाते.याम ध्ये गावातील सर्व जाती धर्मातील लोकं तरुण मोठ्या संख्येने उपस्थित असतात. सामाजिक धार्मिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे सिध्दार्थ भानुदास भादवे यांनी स्वखर्चाने दर्गा परिसरात पत्र्याच्या शेडच काम केले असून त्यांच्या या कार्यामुळे सामाजिक एकतेचा चांगला संदेश गेला आहे.

## शेतकऱ्यांना वेठीस...

अनेक कामे केली. त्यांना जातीची व इतर प्रमाणपत्र मिळवून दिली . अशाच प्रकारची कामाची धडक मोहीम त्यांनी बीडला आल्यानंतर सुरू केलेली आहे . प्रत्येक आठवड्याला ते उपजिल्हाधिकारी व तहसीलदार आणि त्यांचे अधिनस्त मंडळ अधिकारी , तलाठी यांच्या बैठका

पान ४ वरून पुढे...

ऑनलाईन पद्धतीने घेतात . यात कोणाचेही फेरफार प्रलंबित राहता कामा नये , नागरिकांची शेतकऱ्यांची फार्मर आयडी तात्काळ काढण्यात यावेत , यासाठी ते पाठपुरावा करीत असतात. अपर जिल्हाधिकारी यांच्या भेटीमुळे ग्रामीण भागातील कर्मचारी यांना आश्चर्याचा धक्का बसला आहे . तसेच वरिष्ठ कधीही आपल्या कामकाजाचा आढावा घेऊ शकतात याची जाणीव झाली . तथापि अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नमूद केले आहे की केवळ जनतेची कामे वेगाने व्हावी याच उद्देशाने माझ्या भेटी असतात आणि नागरिकांना थेट मला आपले प्रश्न सांगता यावेत यासाठी माझी ही भेट आहे. ग्रामीण भागातील या भेटीमुळे नागरिक भारावून गेल्याचे चित्र दिसले.अशाप्रकारे महसूल विभागाचे अधिकारी , कर्मचारी ग्रामीण भागात फिरत राहिले तर कोणाचेही कामे प्रलंबित राहणार नाहीत यात शंका नसावी .

## श्रावण मासारंभ...

आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. अरुण राख, प्रा. आनंद घोंगडे राष्ट्रीय छात्र सेना विभाग प्रमुख कॅप्टन अजयकुमार पालवे, प्रा. ब्रह्मानंद दराडे यांनी

पान ४ वरून पुढे...

केले. सदर स्वच्छता मोहीम प्रसंगी डॉ अर्जुन केरकळ, डॉ. अभिमन्यू ढोरमारे, डॉ प्रशांत साळवे, डॉ.अशोक डोळस, डॉ.भगवान सांगळे, प्रा.विनोदकुमार चेमटे प्रा. संदीप कराड उपस्थित होते.

## माजी आ. भीमराव...

यशस्वी व्हावेत यासाठी गेल्या अनेक वर्षापासून अशाच प्रकारे प्रत्येक वर्षी संस्थांतर्गत क्रीडा महोत्सवाचे आयोजन आष्टी येथे करण्यात येते परंतु यावर्षी कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयांमध्ये या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेअंतर्गत सर्व माध्यमिक विद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालय प्राथमिक शाळा या स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत. गेल्या आठ दिवसांपासून महाविद्यालयाच्या परिसरात वेगवेगळ्या खेळाची मैदाने बनवण्याची जोरदार तयारी सुरू आहे. स्पर्धेत सुमारे ४ हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत. विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचे संघ असून वैयक्तिक व सांघिक स्पर्धा होणार असून या स्पर्धा पाहणे व आपल्या पाल्यांचे कौतुक पाहण्यासाठी परिसरातील पालक, नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक प्राचार्य डॉ हरिदास विधाते, प्राचार्य डॉ. अशोक गदादे, प्राचार्य संजय धोंडे, प्राचार्य

पान ४ वरून पुढे...

दादासाहेब काळे, मुख्याध्यापक संजय कोथमिरे यांच्या वतीने करण्यात आले आहे

## नगरपालिके समोरच्या...

सामान्य जनतेच्या भावनांशी हे प्रशासन खेळत आहे. उप मुख्यमंत्री अजितदादा पवार सध्या जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत. त्यांनी या रस्त्याचे गांभीर्य घेऊन नव्याने तयार करावा या साठी त्यांना पत्र पाठवणार असल्याचे उल्हास गिराम यांनी कळवले.

## राशनमाफियांवर गुन्हा...

अशोक घुगे यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करावा. संबंधित राशन दुकानाचा परवाना रद्द करावा. पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्यांनी घेतलेले जवाब दुकानदाराच्या नातेवाईकांसमोर दबावाखाली घेतले गेले असून, ते ग्राह्य धरू नयेत. दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करून धान्य काळाबाजार प्रकरणाचा सखोल तपास करण्यात यावा. या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडले जाईल अथवा न्यायालयात दाद मागण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# अंबाजोगाईत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात; ग्रंथ दिंडी व संत सावतामाळी पालखी भव्य मिरवणूकीने लक्ष वेधले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

श्री संत शिरोमणी सावता महाराज संजीवन सोहळ्यानिमित्त अंबाजोगाईत दिनांक १६ ते २२ जुलै दरम्यान ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी ग्रंथ दिंडी व संत सावतामाळी पालखी भव्य सवाद्य मिरवणूक, आतिषबाजी, भाविक भक्तांच्या जयघोषात सप्ताहास सुरूवात झाली.



प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शहरातील संत सावतामाळी मंदिर, आद्यकवी मुकुंदराज रोड, अंबाजोगाई (जि.बीड.) या ठिकाणी आयोजित श्री संत सावता महाराज महात्म्य कथा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ बुधवार, दिनांक १६ जुलै रोजी सकाळी साडे आठ वाजता जिरे गल्ली येथून ग्रंथ दिंडीने झाला, सवाद्य मिरवणूक, आकर्षक पालखी सजवून, भगव्या पताका खांद्यावर घेऊन, टाळ-मृदंग-वीणा घेऊन विठोबा- रखुमाई, ज्ञानदेव-तुकाराम नामाचा गजर करीत लहान मुले व मुली विठ्ठल-रखुमाई, विविध संत यांची वेशभूषा करून तर महिला भगिनी यांनी कलश सजवून, तुळशी वृंदावन आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी घेऊन या मिरवणुकीत सहभाग घेतला. यावेळी ज्येष्ठ नागरिक, युवक हिरीरीने सहभागी झाले होते. त्यानंतर सकाळी आकरा वाजता कलश पूजन व टाळ-वीणा-मृदंग पूजन हस्ते ह.भ.प.किसन महाराज पवार, ह.भ.प.गुरूवर्य प्रेममुर्ती अरूण महाराज बर्दापूरकर, ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, कल्याण आखाडे, आनंद शंकरराव शिंदे, ह.भ.प.अरूण महाराज शिनगारे, ह.भ.प.अमोल महाराज घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर ह.भ.प.महेश महाराज येरोळकर, मूंदगाचार्य ह.भ.प.गणेश आढाव, ह.भ.प.ऋषि महाराज मोरवडकर, ह.भ.प.दिपक महाराज कोरडे, गायनाचार्य ह.भ.प.महेश महाराज येरोळकर, भजनी मंडळ : श्री मुकुंदराज गुरूकुलचे सर्व विद्यार्थी (मुकुंदराज स्वामी मंदिर,अंबाजोगाई) हे होते. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, कल्याण आखाडे, ह.भ.प.अरूण महाराज शिनगारे, ह.भ.प.किसन महाराज पवार यांनी ही आपले समायोचित विचार व्यक्त केले. तर सुत्रसंचालन राम घोडके यांनी केले. या सप्ताहाची सांगता बुधवार, दि.२३ जुलै रोजी ह.भ.प.गुरूवर्य प्रेममुर्ती अरूण महाराज बर्दापूरकर यांचे काल्याचे किर्तन सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत होवून त्यानंतर महाप्रसाद होईल. सप्ताहाचे आयोजनासाठी संयोजन समितीचे अध्यक्ष अंकुश घोडके, उपाध्यक्ष सुरेश बलुतकर, अनंत अरसुडे, सचिव अर्जुन वाघमारे, सहसचिव भागवत मसने, कोषाध्यक्ष संतोष राऊत, राम घोडके, सदस्य सर्वश्री बळीराम चोपणे, प्रकाश बलुतकर, लक्ष्मण पाथरकर, मधुकर जिरे, नामदेव माळी, दत्तात्रय घोडके, रमेश जिरे, बबन घोडके, दशरथ जिरे, बालासाहेब मसने, अशोक बलुतकर, बालासाहेब माळी, प्रदीप जिरे, विष्णु राऊत, सुभाष चोपणे, डॉ.सुरेश अरसुडे, डॉ.दिपक फुटाणे, बालासाहेब चोपणे, विठ्ठल शिंदे, रमेश घोडके, सिद्राम घोडके, मधुकर घोडके, अशोक जिरे, तुषार करपुडे, बालासाहेब घोडके, संतोष जिरे, गोविंद पाथरकर, पवन जिरे, योगेश डाके, महेश सपाटे, आशिष आढाव, अभिजीत जिरे, शरद माळी, तुकाराम माळी, मंगेश बलुतकर, नितीन जिरे, दिपक गिरे, बबनराव जाधव, पंकज राऊत यांनी तसेच संयोजक, समस्त माळी समाज अंबाजोगाई यांनी पुढाकार घेतला आहे.



*कडा : येथील युवक,शोएब भाई पठाण यांचा २५ वा वाढदिवस दि.१५ जुलै रोजी होता. या युवकाने आपला वाढदिवस कडा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून व आरती करून आपला वाढदिवस साजरा केला.यावेळी भीमराव (अण्णा) पाटील, किरण काळे,राजू शिंदे सह मित्रपरिवार उपस्थित होता.*

## संत शिरोमणी सावता महाराज पुण्यतिथी घरोघरी साजरी करुन युवकांनी व्यसनमुक्त होण्याचा संकल्प करावा : सौ. वर्षा शिंदे

**पाटोदा । प्रतिनिधी**

संत शिरोमणी सावता महाराज यांची पुण्यतिथी यंदा केवळ पूजाअर्चेपुरती मर्यादित न ठेवता, ती सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने एक पाऊल ठरावी, असे मत सावता सेनेच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षा सौ. वर्षा शिंदे यांनी व्यक्त केले आहे.त्यांनी सांगितले की, संत सावता महाराज हे कार्य, श्रद्धा आणि समाज सेवेचे प्रतीक होते. त्यांनी शेती करताना समाजाला समतेचा, शुद्ध आचरणाचा आणि भक्तीमार्गाचा संदेश दिला. त्यांच्या पुण्यतिथी निमित्त युवकांनी एकत्र येऊन व्यसनमुक्त समाज घडवण्याचा संकल्प करावा,



हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल. संतांच्या पुण्यतिथी निमित्त घरोघरी दीप प्रज्वलन, अभंग गायन, हरिपाठ आणि सामूहिक प्रार्थना घेण्यात यावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या दिवशी युवकांनी तंबाखू, दारू, गांजा यांसारख्या व्यसनांपासून कायमचा संयम बाळगण्याचा संकल्प करून आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवावा, असेही त्यांनी सांगितले.संत सावता महाराज यांच्या जीवनचरित्रातून प्रेरणा घेऊन युवकांनी समाजात बंधुभाव, सेवा आणि स्वच्छतेचा संदेश पसरवावा, असे आवाहन करत संतांचा मार्ग म्हणजेच स्वच्छ जीवनाची वाट! असा संदेश त्यांनी दिला.या उपक्रमातून समाजात व्यसनमुक्तीचा नवा आदर्श निर्माण होईल आणि संतांचे विचार खऱ्या अर्थाने आचरणात येतील, असा विश्वासही सौ. वर्षा शिंदे यांनी व्यक्त केला आहे



*गेवराई नगर परिषद च्या वतीने आज श्री च्या पालखीचे स्वागत गेवराई शहरात करण्यात आले.. यावेळी लोकनेते आदरणीय बाळराजे (दादा) पवार, गेवराई नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रमजी मांडुरके, गेवराई नगर परिषद चे माजी नगर अध्यक्ष सुशील जवंजाळ, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनक व सर्व सन्माननीय माजी नगरसेवक उपस्थित होते.*

# स्वा. सै. रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शाहिस्ता इनामदार यांच्या पुढाकाराने विधी महाविद्यालयात स्पोकन इंग्लिश कोर्सचा प्रारंभ; सर्वांनी लाभ घ्यावा: इंजि.देविसिंह शिंदे

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यात अगदी ग्रामीण भागात सुद्धा खालच्या स्तरापर्यंत शिक्षणाचा प्रसार व्हावा, सर्व पिढी सुशिक्षित, प्रगल्भ व वैचारिक व्हावी, या उदात्त हेतुने सुरू करण्यात आलेल्या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या या ध्येय धोरणाला अनुसरून स्वातंत्र्य दिनाच्या शुभ दिवसापासुन बीड जिल्ह्यातील लोकांना इंग्रजीच्या भयापासुन स्वातंत्र्य मिळुन त्यांना अत्यल्प दरात इंग्रजी संभाषण कौशल्य मिळाव, या एकमेव शुद्ध हेतुने स्वा. सै. रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शाहिस्ता इनामदार यांच्या पुढाकाराने व इंजि. देविसिंह शिंदे यांच्या संकल्पनेतुन शासनाची मान्यताप्राप्त व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिकृत व बार असोसिएशनशी संलग्न असलेल्या बीडच्या एकमेव नामांकित स्वातंत्र्यसेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालया द्वारे अधिकृत प्रमाणित स्पोकन इंग्लिश कोर्स उपलब्ध करण्यात आला असुन



तो बीड जिल्ह्यातील नागरिकांना ऑफलाईन तर बीड जिल्हा सोडून बाहेर सर्व जिल्ह्यातील नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध असेल. त्यामुळे त्याचा बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील सर्व वयाच्या, स्तराच्या, विविध क्षेत्रातील जास्तीत जास्त विद्यार्थी, युवक, युवती, शासकीय, निमशासकीय, व खासगी नौकरदार, व्यावसायिक, गृहिणी, शेतकरी स्त्री-पुरुष यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन या कोर्सचे समन्वयक प्रमुख इंजि. देविसिंह शिंदे यांनी केले आहे. सेच एकाच क्षेत्रातील सहकारी असल्यामुळे सर्व वकील बंधू-भगिनींना यासाठी अजुन विशेष सवलत दिलेली आहे. तसेच आपल्याच शाळा व महाविद्यालयाच्या शिफारस घेऊन येणाऱ्या विद्यार्थ्यांना व एकदम पुर्ण शुल्क (फीस) भरणाऱ्यांना विशेष सवलत देण्यात येणार आहे. या कोर्समध्ये आत्मविश्वासाने इंग्रजी बोलायची कला, शब्दसंपत्तीपेक्षा आत्मविश्वासावर लक्ष केंद्रित, मुलाखत (इंटरव्ह्यू), नौकरी किंवा कोणत्याही संवादात सहज बोलता येईल तेही व्याकरण फारस शिकण्याची गरज नाही, सहज बोलायला सुरूवात करता येईल असा सोपा, सुटसुटीत नियोजनबद्ध पद्धतीने अभ्यासक्रम तयार केलेला आहे.

यामध्ये शेवटी सरकारी मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न असलेल्या नामांकित महाविद्यालयातून इंग्रजी बोलण्याचा अभ्यासक्रम व तो यशस्वी पुर्ण केल्याच त्या क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते अधिकृत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

अशा प्रकारचा अनोखा उपक्रम व अभ्यासक्रम बीडमध्ये पहिल्यांदाच सुरू केलेला असून त्याचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा व नाव नोंदणी व प्रवेशासाठी ९७६७३०७४४ या क्रमांकावर अथवा विधी महाविद्यालयात प्राचार्या डॉ. शाहिस्ता इनामदार यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन या कोर्सचे समन्वयक प्रमुख इंजि. देविसिंह शिंदे यांनी केल आहे.

## भाजपच्या पात्रुड मंडळ उपाध्यक्ष पदी सौ.सविता बडेंची निवड



**तेलगाव । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी पात्रुड मंडळाच्या उपाध्यक्ष पदी सौ.सविता सुर्यकांत बडे यांची निवड करण्यात आली.याबद्दल सौ.बडे यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

बीड जिल्ह्यात महाराष्ट्राच्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीचे आचार विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी गाव तेथे भाजप शाखा व घर तेथे भाजप कार्यकर्ता हे ब्रीद प्रत्यक्षात राबवण्यासाठी भाजप मंडळ पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात येत आहेत. ना.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख व अरूण आबा राउत ,माजी नगराध्यक्ष अशोक तिडके, अभिजित सोंळके यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव तालुक्यातील पात्रुड मंडळाची कार्यकरणी निवड आली. यात नित्रुड ग्राम पंचायतच्या ग्राम पंचायत सदस्या सौ.सविता सुर्यकांत बडे यांची भाजपच्या पात्रुड मंडळाच्या उपाध्यक्ष पदी निवड करून, त्यांच्यावर पक्षाची जबाबदारी सोपविण्यात आली. सौ.सविता सुर्यकांत बडे या राजकारणात सक्रिय झाल्यापासून लोकनेते स्व गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रेरणेने व ना.पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपात कार्य करत असुन, वेळोवेळी पक्षाच्या विविध कार्यक्रम व इतर सभा, मेळाव्यांना कायम हजेरी लावत असतात. तसेच पक्षाच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्न सोडवण्यास कटिबद्ध असतात. त्यांनी कोणताही स्वार्थ न ठेवता प्रामाणिकपणे पक्ष कार्य व समाज कार्य करत आपले कार्य चालुच ठेवले.त्यांच्या कार्याची ना.पंकजाताई व पक्षाने दखल घेत त्यांच्या माजलगाव तालुका ग्रामीणच्या पात्रुड मंडळ उपाध्यक्ष पदाची जबाबदारी देत त्यांचा सन्मान केला.यानिवडी बद्दल सौ.सविता सुर्यकांत बडे यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## चौंकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक: BED/14596/18/24

फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक: ____________________

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १८-०७-२०२५ रोजी दिली

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक सादेक एजुकेशनल चॅरिटेबल ट्रस्ट अंबेजोगाई बाबत

न्यासाचा पत्ता :- सादेक हाउस, करबला बेस रविवार पेठ, अंबेजोगाई, बीड, अंबेजोगाई, अंबेजोगाई

**अर्जदार – सादेक मूणिरोददीन शेख,**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, बीड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**

अ.क्र., तपशील, अंदाजे मूल्य

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. /- मात्र ( अक्षरी रुपये मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

अ.क्र., शहर किंवा गांव , सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र., क्षेत्र, मूल्यांकन, मुदत / कालावधी किंवा स्वरूप, अंदाजे मूल्य

(ब) स्थावर मिळकत: रोख रु. /- मात्र ( अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी

कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १८-०७-२०२५ रोजी दिली.

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड**

## चौंकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक: BED/12070/18/24

फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक: ____________________

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री तुळजाभवानी मंदिर सोनाजीनगर सावरगाव बाबत

न्यासाचा पत्ता :- तलजाई निवास, सोनाजी नगर सावरगाव, सोनाजी नगर सावरगाव, बीड, माजलगाव, सावरगाव

**अर्जदार:- विजय मोहनराव जगताप,**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, बीड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

जंगम मिळकत (वर्णन)

**अ.क्र., तपशील, अंदाजे मूल्य**

1. PITALI GHANTA, 3000.00    2.PITALI SAMAI, 2000.00

**(अ) जंगम मिळकत :- रोख रु.५०००/- मात्र ( अक्षरी रुपये पाच हजार मात्र फक्त)**

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | AT POST SONAJINAGAR SAWARGAON TQ MAJALGAON DIST BE | 36/4 | 0.20 HR | 21780 SFT | TEMPEL LAND | 1150000.00 |
| 2 | AT POST SONAJINAGAR SAWARGAON TQ MAJALGAON DIST BE | 36/4 | 110 X 91 SFT | 10010 | TEMPEL CONSTRACTION | 2950000.00 |

**(ब) स्थावर मिळकत :- रोख रु. ४१०००००/- मात्र**

( अक्षरी रुपये एक्केचाळीस लाख मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १८-०७-२०२५ रोजी दिली

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड**

दैनिक
● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
शनिवार, दि.१९ जुलै २०२५ पान ४

## हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक सुलेमान बाबा यांचा गुरुवारी ऊर्स

कडा । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील ग्रामदैवत हजरत सुलेमान बाबा यांचा उरूस आज गुरुवार रोजी साजरा होत आहे.सुलेमान बाबा यांचा ऊर्स म्हणजे यात्रा आषाढ महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी असते परंतु लक्ष्मी आईची यात्रा तिसऱ्या मंगळवारी झाल्या शिवाय बाबांची यात्रा होत नाही.म्हणून यंदा चौथ्या गुरुवारी ही यात्रा साजरी होत आहे.ही यात्रा गावातील तसेच बाहेरील सर्व जाती धर्मातील लोकं मोठ्या उत्साहात साजरी करतात. ▶▶ उर्वरित पान २ वर

# शेतकऱ्यांना वेठीस धरू नका , त्यांची कामे लवकर करा: हरिश धार्मिक

## बीडमध्ये अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांचे प्रशासन नागरिकांच्या दारी

**● म्हाळस जवळा येथे विविध ठिकाणी दिल्या भेटी**

बीड । प्रतिनिधी



शुक्रवार १८ जुलै रोजी अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी म्हाळसजवळा मंडळ व ग्राम महसूल अधिकारी म्हाळसजवळा सजाची दप्तर तपासणी केली. अपर जिल्हाधिकारी धार्मिक यांनी अचानक आपला मोर्चा म्हाळसजवळा मंडळाकडे वळविला . धार्मिक यांना मंडळ अधिकारी स्तरावर , ग्राम महसूल अधिकारी स्तरावर म्हणजेच तलाठी स्तरावर कशाप्रकारे कामकाज चालते याची चाचपणी करायची होती . शिवाय शासन निर्देशानुसार मंडळ अधिकारी आणि त्यांच्या अधिनस्त ग्राम महसूल अधिकारी यांचे अभिलेखे म्हणजेच रेकॉर्ड व्यवस्थित ठेवण्यात आलेले आहे काय याची त्यांनी यावेळी पाहणी केली .

या वेळी त्यांनी एका आपले सरकार केंद्राला भेट देऊन विविध प्रमाणपत्र कशा प्रकारे दिले जातात , प्रमाणपत्र देताना विलंब होतो किंवा कसे , काही अडचणी आहेत काय याबाबत सविस्तर माहिती घेतली . बेकायदेशीर कामे कराल तर कारवाई होईल याबाबतही त्यांनी तंबी दिली . सोबतच त्यांना भेटण्यास आलेल्या नागरिकांच्या अडचणींचे तात्काळ निराकरण केले . श्री अविनाश खांडे यांच्या रस्त्याचा प्रश्न अनेक दिवसापासून प्रलंबित आहे . त्याबाबत धार्मिक यांनी तात्काळ तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना फोनद्वारे हा प्रश्न तात्काळ निकाली काढण्याबाबत सूचना दिल्या. उपस्थित नागरिकांशी चर्चा करताना त्यांनी नमूद केले की जिल्हाचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अधिपत्याखाली जिल्हाभरात अनेक लोकोपयोगी कार्यक्रम सुरू आहेत . जिल्हाधिकारी स्वतः विविध तालुक्यांना फिरून छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर योजना , महाराजस्व योजना , जिवंत सातबारा योजना , रस्त्याच्या विविध योजना , अनेक प्रमाणपत्रांचे वाटप यासाठी फिरत आहेत . साक्षाळ पिंपरी येथे जिल्हाधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना बालविवाह करणार नाही तसेच शेतकरी आत्महत्या होऊ देणार नाही अशा आशयाची शपथ दिली होती . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक हे यापूर्वी कोल्हापूर जिल्ह्यात कार्यरत होते . तेथे त्यांनी भटक्या विमुक्त जाती – जमातीसाठी ▶▶ उर्वरित पान २ वर

## श्रावण मासारंभ निमित्त वनदेव टेकडी परिसरामध्ये स्वच्छता मोहीम



पाथर्डी । प्रतिनिधी

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या वतीने श्रावण मास आरंभ निमित्त पूर्व तयारी म्हणून वनदेव टेकडी परिसरामध्ये स्वच्छता मोहीम घेण्यात आली. यामध्ये वनदेव टेकडी परिसरामधील वृक्षांना आळी करणे, टेकडी परिसरामधील प्लास्टिक, कचरा जमा करून त्याचे निर्मूलन करण्यात आले तसेच मंदिर परिसरातील गाजर गवत निर्मूलन करून साफसफाई करण्यात आली. या मोहिमेमध्ये राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. श्रावण मासाचे औचित्य साधून पाथर्डी शहरामधील भाविक या मंदिराला पूर्ण श्रावण महिन्यात भेट देत असतात. श्रावणमासात वनदेव मंदिरामध्ये पूजा, आरती, शांतीपाठ, होमहवन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या ठिकाणी भाविकांना मन:शांती मिळाल्याची अनुभूती येते. पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या संकल्पनेतून व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहिमेचे ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: संत शिरोमणी सावता महाराज यांच्या प्राणप्रतिष्ठापना कलश रोहन कार्यक्रमानिमित्त ह भ प महादेव महाराज जवळेकर यांच्या समवेत भारतीय जनता पक्षाचे नेते नवनाथ आण्णा शिराळे पाटील, जिल्हा उपाध्यक्ष पाटील ,मेहत्रे, मॅनेजर गिराम पाटील.*

## माजी आ. भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली सिने अभिनेता सुरेश विश्वकर्मा यांच्या हस्ते क्रीडा महोत्सवाचे आज उद्घाटन

कडा । प्रतिनिधी



आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार व शिक्षण महर्षी भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथे दिनांक १९ ते २१ जुलै असा तीन दिवसांचा भव्य क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. सिने अभिनेता व महाविद्यालययाचा माजी विद्यार्थी सुरेश विश्वकर्मा यांच्या हस्ते क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन दिनांक १९ जुलै रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. यावेळी अध्यक्षस्थानी माजी आमदार भीमराव धोंडे हे उपस्थित राहणार असुन प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते अजय दादा धोंडे, अभयराजे धोंडे, संजय नवगिरे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस हे उपस्थित राहणार आहेत अशी माहिती संयोजक व प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत अधिक माहिती देताना प्राचार्य डॉ. विधाते यांनी सांगितले की, शेतकरी शिक्षण संस्था, आनंद चॅरिटेबल शिक्षण संस्था, किसान शिक्षण संस्था व छत्रपती शाहू फुले आंबेडकर शिक्षण संस्था या सर्व संस्थेच्या अंतर्गत सर्व माध्यमिक, उच्चमाध्यमिक विद्यालये व महाविद्यालयांच्या सांघिक / वैयक्तिक क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर १९ ते २१ जुलै या कालावधीत या स्पर्धा होणार आहेत.

विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासाबरोबर खेळाचेही ज्ञान मिळावे. खेळातून पुढे जाऊन यशस्वी व्हावे, राज्य आणि देशपातळीवर ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळात ▶▶ उर्वरित पान २ वर

# आष्टी,पाटोदा,शिरूर (कासार) भा.ज.पा.मंडळ अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये आ.सुरेश धस यांच्या समर्थकांचीच वर्णी

**● सोशल इंजिनिअरिंगच्या माध्यमातून समान संधीचा संदेश**

आष्टी । प्रतिनिधी




आष्टी विधानसभा मतदारसंघ अंतर्गत असलेल्या आष्टी मंडळ, कडा मंडळ, पाटोदा मंडळ, आणि शिरूर (कासार) मंडळ अध्यक्षांच्या निवडीमध्ये आ.सुरेश धस यांच्या कट्टर समर्थकांचीच वर्णी लागली असून या निवडी मधील सोशल इंजिनिअरिंग मुळे सर्व समाज घटकांना प्रतिनिधित्व मिळाले आहे. भारतीय जनता पार्टीच्या मंडल अध्यक्ष पदाच्या नियुक्ती अनेक दिवसांपासून प्रतीक्षेमध्येच होत्या मात्र पुन्हा एकदा आष्टी विधानसभा मतदार संघातील तीनही तालुक्यांच्या मंडळ अध्यक्षपदी निवडीवरून आ.सुरेश धस यांचे वर्चस्व पुन्हा एकदा अबाधित राहिले आहे. मुंबई येथे प्रदेश कार्यालयामध्ये आष्टी मंडळ अध्यक्षपदी रमेश गावडे, कडा मंडळ अध्यक्षपदी अनिल ढोबळे, पाटोदा मंडळ अध्यक्षपदी भागवत येवले आणि शिरूर (कासार) मंडळ अध्यक्षपदी सुरेश उगलमुगले या नवनिर्वाचित मंडळ अध्यक्षांना सन्मानपत्र सह नियुक्तीपत्र आमदार सुरेश धस यांचे हस्ते सुपूर्द करण्यात आले यावेळी अल्पसंख्यांक आघाडीचे सलीम जहांगीर उपस्थित होते या चारही मंडळ अध्यक्ष पदाच्या निवडीवरून आमदार सुरेश धस यांनी सर्वसाधारण प्रवर्ग इतर मागासवर्गीय प्रवर्ग आणि विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्ग असा सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग केल्यामुळे सुरेश धस यांच्या प्रगल्भ नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीमध्ये सर्वांना समान न्याय देण्यात येतो असा संदेश या निवडीद्वारे दिलेला दिसून येत आहे

# नगरपालिके समोरच्या रस्त्याची मालकी कोणाकडे? प्रशासनाने आगोदर जाहीर करावे: उल्हास गिराम

## रस्त्याची झाली चाळण, रस्त्यासाठी नेमकं कोणतं प्रशासन ?

बीड । प्रतिनिधी



बीड शहरातील प्रमुख रस्त्या पैकी एक असणारा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, या रस्त्याची चाळन झाली आहे. नगर पालिका, जिल्हापरिषद याचा मार्गांवर असुन या रस्त्यावर शेकडो लहान मोठे खड्डे पडले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी या रस्त्यावरील खड्या संदर्भात नगरपालिके कडे विचारणा केली तर संबंधित रस्ता आमच्या कडे नसून हा रोड सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ) कडे असल्याचे सांगितले, बांधकाम विभागाला विचारले असता त्यांनी नगर पालिकेकडे असल्याचे सांगितले. संबंधित रस्त्याचा मालक कोण ? हे प्रशासनाने आगोदर जाहीर करावे, असे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी पत्रकात म्हंटले आहे.

सोमवारी या रस्त्याच्या समस्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्याच्या भेटी घेणार असुन. येत्या महिनाभरात हा रस्ता नव्याने तयार व्हावा या साठी पाठपुरावा करणा असल्याचे उल्हास गिराम यांनी सांगितले. बीड शहरातील मुख्य बाजारपेठेत जाणारा हा मार्ग प्रमुख प्रशासकीय कार्यालयाला ही जोडला आहे. शाळा, महाविद्यालये, बाजार मुख्यालयाला हा प्रमुख रस्ता असुन अश्या उडवा उडवीच्या उत्तराने चीड निर्माण होत आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# राशनमाफियांवर गुन्हा नोंदवून परवाना रद्द करा

## भगवान बाबा युवासेनेची प्रशासनाकडे मागणी ; कारवाई न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील होळ येथील राशन दुकानातून गरीबांसाठी आलेले ४४ क्विंटल धान्य काळ्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना धारूर पोलिसांनी दि. १४ जुलै रोजी टेम्पो (क्र. एम.एच. ४४ यू २२५७) पकडून मोठा काळाबाजार उघडकीस आणला आहे. उपसरपंच बाळासाहेब घुगे यांच्या कोलंबस सहकारी संस्थेअंतर्गत चालणाऱ्या राशन दुकानातून त्यांचा भाऊ अशोक घुगे याच्यामार्फत हे धान्य विक्रीसाठी नेत असल्याचे उघड झाले असून, वाहन चालक इब्राहिम शेख याने पोलिसांसमोर स्पष्ट कबुली दिली आहे. याप्रकरणात धारूर पोलिसांनी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी भगवान बाबा युवासेनेच्यावतीने शुक्रवारी (दि.१८) जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

भगवान बाबा युवासेनेचे अध्यक्ष विजय केंद्रे यांच्या नेतृत्वाखाली अंबाजोगाईचे उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी युवा नेते धनराज लाटे, राम घुगे, पत्रकार उत्तरेश्वर शिंदे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. निवेदनात म्हटले की, धारूर येथील महसूल व पोलिस प्रशासनाने टोलवाटोलवी न करता होळ येथील राशन दुकानदार व उपसरपंच बाळासाहेब घुगे, ▶▶ उर्वरित पान २ वर

**● राशन दुकान तपासणीतही २ क्विंटलचा घोळ!**

**पुरवठा निरीक्षण अधिकारी सुजाता मेश्राम यांनी राशन दुकानाची तपासणी केली. त्यांनी तहसीलदारांना दिलेल्या अहवालात होळच्या राशन दुकानात ई पॉस मशीनवरील नोंदीपेक्षा ८९ किलो तांदूळ कमी आढळून आला. तर, १ क्विंटल ९ किलो गहू जास्त सापडला. याचा अर्थ अंगठे घेऊन लाभार्थ्यांना गहू दिला नाही. सदरील अहवालावर जिल्हा पुरवठा विभागाला सादर केला जाणार आहे. दरम्यान, याप्रकरणात राशनमाफियांचा पुरवठा विभागावर राजकीय दबाव असल्याचा आरोप केला जात आहे.**

**● धारूर पोलिसांचे राशनमाफियांशी लागेबांधे**

**धारूर पोलिसांनी स्वस्त धान्य पकडले. याप्रकरणात वाहनचालकाने कबुली देऊनही पोलिसांनी फिर्याद दिली नाही. त्यामुळे संताप व्यक्त केला जात असून धारूर पोलिसांविरोधात आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.**

## उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक आज बीड जिल्हा दौऱ्यावर

बीड । प्रतिनिधी

उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. शनिवार, १९ जुलै रोजी छत्रपती संभाजी नगरहून मोटारीने गेवराई येथे दुपारी एक वाजता आगमन. कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कोल्हेर रोड वरील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात आयोजित गोर बंजारा समाजाच्या एकता मेळाव्यास उपस्थिती. दुपारी ४ वाजता मोटारीने पुसद, जि. यवतमाळकडे प्रयाण

